यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479
परीक्षा विभाग / Examination Division

जा.क्र./पनिका- / 2023/1349 दि. ०७.१२.२०२३

## *दीक्षांत समारंभ उपस्थितीसाठी नोंदणीबाबत*

विद्यापीठाचा २९ वा दीक्षांत (पदवीदान) समारंभ बुधवार दि. २० डिसेंबर २०२३ रोजी नाशिक येथे विद्यापीठ मुख्यालयातील प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे. त्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मधील (डिसेंबर २०२२,मार्च २०२३ व मे/जून २०२३ह्या परीक्षांमध्ये) उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहेत. या प्रसंगी आपण विद्यापीठ मुख्यालय, नाशिक येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करण्यासाठी येणार असाल तर आपण https://29convocation.ycmou.ac.in/attendance या लिंकवर जाऊन आपल्या उपस्थिती बाबतची माहिती कृपया ऑनलाईन पद्धतीने भरावी. सदरची लिंक दि. ०५/१२/२०२३ ते दि. ११/१२/२०२३ या कालावधीत सुरू राहील या कालावधीतच नोंदणी करता येईल यास मुदतवाढ मिळणार नाही. आपण ऑनलाईन नोंदणी केल्यानंतरच आपणांस येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी ग्रहण करता येईल. नाशिक येथे दीक्षांत समारोहाच्या दिवशी सकाळी ठीक ९.०० वाजता हजर राहून अनामत रक्कम रु. ५००/- भरून दीक्षांत शाल घ्यावी लागेल. अनामत रक्कम ऑनलाईन भरण्यासाठीची लिंक लवकरच विद्यापीठ पोर्टलवर ( https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=28329 ) देण्यात येईल तसेच दीक्षांत समारोहासंबंधीची सर्व माहिती/सूचना सुद्धा समारंभापूर्वी वेळोवेळी विद्यापीठ पोर्टलला वरील लिंकला प्रसिद्ध केल्या जातील त्या विद्यार्थ्यांनी पहाव्यात.

ज्या विद्यार्थ्यांनी ह्या वेब पेजवर आपल्या उपस्थिती बाबतची ऑनलाईन स्वीकृती नोंदवली आहे त्यांनाच दीक्षांत समारोहाच्या दिवशी पदविका/ पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. अश्या विद्यार्थांनी दीक्षांत शाल अनामत रक्कम अगोदरच ऑनलाईन पद्धतीने भरून त्याची पावती सोबत घेऊन यावे. ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली नाही, त्यांची पदविका/ पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारोहानंतर काही कालावधीत त्यांच्या अभ्यासकेंद्रामार्फत वितरीत केली जातील, त्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. नोंदणी न करता आलेल्या विद्यार्थ्यांना पदविका/ पदवी प्रमाणपत्र दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

Ph.D. ह्या पदवीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी येथे उपस्थितीबाबत माहिती नोंदविण्याची आवश्यकता नाही. त्यांची उपस्थिती ग्राह्य धरण्यात आलेली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ज्ञानगंगा घरोघरी नाशिक

**(भटूप्रसाद पाटील)**
**परीक्षा नियंत्रक**